# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

## सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२

## नगर विकास विभाग

## कपात सूचनांची एकुण संख्या - ४१

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: १०९, रूपये:- २,५६,२३,३४,०००/-**<br>**श्री. विकास ठाकरे** |
| (१) | ४७३२ | १० | नागपूर येथील प्रसिद्ध गोरेवाडा तलाव व घाट ब्रिटिश कालीन असून हा खूप काळा पासून नागपूर च्या जनतेस उपयोगात येत असून सार्वजनिक व धार्मिक कार्या करीता लोक याचा वापर करीत असून, परंतु गेले काही वर्षे झाले तलाव परिसर आणि घाट याची खूप दूरवस्था झाली आहे आणि नागरिकांची सोयी अभावी खूप गैरसोय होत आहे, त्या करिता प्रकाश व्यवस्था, तसेच पूजा विधी करण्या करिता घाट बांधकाम, तलावाला पूर सवरक्षण भिंत तसेच तिथे येणाऱ्या भक्त आणि नागरिकांनकरीता एक कपडे बदलायची रूम आणि स्वच्छता गृह, सुशोभीकरण व येणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधांचा अभाव असल्या मुळे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ११०, रूपये:- २,२२,००,००,०००/-**<br>**श्री. संजय पोतनीस** |
| (२) | ४५२९ | १०० | हंस भ्रुगा रोड लगत (सांताक्रुझ-चेंबुर) विद्यापीठाच्या प्रवेशद्वारापासून पश्चिम द्रुतगती मार्गापर्यत मध्यभागी ( रत्याच्या दक्षिण बाजुल ) अस्तित्वात असलेली ६०० मीमी व्यासाच्या मलःनिसारण वाहिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणाऱ्या उन्नत मार्गाच्या कामामुळे व रस्त्याच्या कामामुळे अनेक ठिकाणी तुटलेली असून त्यामुळे सद्यस्थितीमध्ये सदरहू मलःनिस्सारण वाहिनी कार्यान्वित नाही. सरविस रोडवर स्थलांतरित करण्याचे काम मुंबई महानगर विकास प्राधिकरण मार्फत बांधण्यात येत असलेल्या सर्व्हिस रोड व उडडाणपुलाच्या कामामये अंतर्भूत करण्यात यावे याबाबत एम.एम आर.डी ए व मुंबई महानगरपालिका संबंधित अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली आहे.तसेच निर्णयही झालेला आहे तरीसुदा सदरहु काम रखडलेले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या मलःनिस्सारण वाहिनीबाबत नियमाप्रमाणे रिर्माक्स घेऊन काम सुरु करणे आवश्यक होते.तथापि तसे न करता काम सुरु करण्यात आलेले आहे असे निदर्शनास आलेले आहे, तसेच सदरहू ६०० एम एम व्यासाच्या मलःनिसारण वाहिनी स्थलांतर करâन कार्यान्वित करण्याचे काम होत नसल्यामुळे राजेंद्र कांबळे मार्ग, वाकोला येथे टाकण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आलेली नवीन मलनिःसारण वाहिनी हंस भुग्रा रोडवर अस्तितवात असलेल्या मुख्य मलनिस्सारण वाहिनीस जोडून कार्यान्वित करण्याचे काम गेल्या दोन वर्षापासून थांबलेले आहे, प्रलंबित काम वेळेत पूर्ण करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास,**<br>**बाब क्रमांक: ११२, रूपये:- २,९१,१९,००,०००/-**<br>**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (३) | ४७०३ | १० | नगर पंचायत तिवसा मधील वाढती लोक संख्या पाहता दरवर्षी पिण्याचे पाण्याची मोठया प्रमाणात टंचाई निर्माण होते. पाणी टंचाई दुर करण्यासाठी मागील काळात अप्पर वर्धा जलाशयातून 0.978 दशलक्षघ. मि. पाणी आरक्षीत मंजुर आहे. परंतु विद्यामान लोकसंख्येच्या अनुषंगाने पाणी योजने मंजुरीधीन असलेल्या पाणी योजनेला 135 लिटर पर माणसीप्रमाणे 1.3 दशलक्षघ घन मिटर पाणी जलसंपदा मार्फत वाढवुन देण्याचे गरजेचे आहे. सदर पाणी पाणी पुरवठयाचा प्रस्ताव मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (४) | ४५८३ | १०० | अमृत २ योजनेअंतर्गत नाशिक महानगरपालीकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून दुसऱ्यांदा त्रुटी व आक्षेप घेतल्याने आता महानगरपालिकेवर तिसऱ्यांदा सुधारित आराखडा करण्याची नामुष्की आलेली असणे, नाशिक महानगरपालिकेने शहरातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी रु. ३५४.८८ कोटींचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून तांत्रिक तपासणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे दि. २६.१०.२०१८ रोजी सादर केला असणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पत्र देऊन DPR ची छाननी करून काही मुद्दे उपस्थित केले व मुद्यांची पूर्तता करून प्रस्ताव पुनःश्च सादर करण्याच्या सूचना दिल्या असणे, त्यानुसार नाशिक महानगरपालिकेने दि. २८.१.२०१९ रोजी पुनःश्च मुद्यांची पुर्तता करून फेरप्रस्ताव सादर केला असणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने अत्यंतिक निकडीच्या कामांचा समावेश करण्याचे सूचित केल्याने पाणीपुरवठा सुरळीत करणेकामी अत्यंत महत्वाची कामे प्रथम टप्प्यात विचारात घेऊन मजीप्राच्या सन २०१८-१९ च्या दरसूची नुसार सदर योजनेवरील शेरेपूर्ततेअंती व सदर प्रस्तावाची रक्कम रु. २२६.३४ कोटी पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून अंतिम करण्यात आली असणे, सदर कामांना नाशिक महानगरपालिकेकडून तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असणे, आता या योजनेचा आराखडा तयार करणेसाठी नाशिक शहराचा पुढील तीस वर्षांचा विचार करून म्हणजेच २०४१ पर्यंतच्या संभाव्य लोकसंख्येचा आधार घेतला गेलेला असणे, मात्र त्यावरच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आक्षेप घेतल्यामुळे आता महानगरपालिकेला तिसऱ्यांदा सुधारित आराखडा करण्याची वेळ आल्यामुळे यामध्ये पुन्हा कालापव्यय होणार असणे, नवीन जलकुंभ,जलवाहिन्या तसेच नववसाहतींमध्ये नवीन जोडणे देणे अपेक्षित असून त्यासाठी सुमारे ४०० कोटींपेक्षा अधिक निधी लागणार असणे, यापूर्वी अमृत १ अभियानामधून ही योजना मार्गी लावण्यासाठी शासनाला अपयश आल्यामुळे अमृत २ योजने अंतर्गत नाशिक शहराच्या या योजनेसाठी सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आलेला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असणे, मात्र आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संभाव्य लोकसंख्येच्या आधारावर आक्षेप घेत संपूर्ण आराखडाच अवास्तव ठरविलेला असणे, अमृत २ योजनेअंतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या सदर पाणी पुरवठा प्रकल्पास लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३६०४, स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्कमा देणे**<br>**बाब क्रमांक: ११८, रूपये:- २४,२१,७३,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (५) | ४५९२ | १०० | दि. २० डिसेंबर २०२२ रोजी त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथील नदी पात्रामध्ये पर्यावरणाला बाधा निर्माण करणाऱ्या बांधकामाची सांधूच्या जत्थ्याने चिडून या बांधकामांची तोडफोड केली असणे, ब्रम्हगिरी पर्वताचे उत्खनन आणि नदी पात्रातील अवैध बांधकामांमुळे पर्यावरणाला धोका निर्माण होऊ नये म्हणून आंदोलन करणाऱ्या पर्यावरणप्रेमी नागरिकांवर त्र्यंबकेश्वर नगरपालिकेने दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी कलम ३५३ व ४२७ अन्वये गुन्हा दाखल केला असणे,गोदावरीचे उगमस्थान, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेला ब्रम्हगिरी पर्वत पोखरून मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरु असणे, त्यामुळे येथील जैवविविधतेला धोका निर्माण झाला असून पशुपक्षाचे स्थलांतर होत असणे, या उत्खननामुळे पर्वताच्या कडा कोसळून त्र्यंबकेश्वर शहराला धोका निर्माण होणार असणे, त्र्यंबकेश्वर परिसरातील ब्रम्हगिरी संरक्षणासाठी कस्तुरीरंगन समितीच्या अहवालानुसार पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र जाहीर करून परिसरातील जैव संपदेचे जतन करण्याची मागणी पर्यावरण प्रेमींनी केलेली असणे, त्र्यंबकेश्वर परिसरातील मनमोहक वातारणात व सृष्टीसौंदर्याला या उत्खननामुळे बाधा निर्माण झाल्यामुळे येथील पर्यटनावर विपरीत परिणाम होणार असणे, त्र्यंबकेश्वर येथील नदी पात्रात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे आणि अवैध उत्खननामुळे तसेच नदी पात्रात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे आणि अवैध उत्खननामुळे पर्यावरण प्रेमी नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, त्र्यंबकेश्वर येथील ब्रम्हगिरी पर्वताचे उत्खनन आणि नदी पात्रातील अवैध बांधकामे तातडीने थांबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११९, रूपये:- १०,००,००,०००/-**<br>**श्री. मनोहर चंद्रिकापूरे** |
| (६) | ४६६८ | १० | अर्जुनी मोरगांव विधानसभा क्षेत्र गोंदिया जिल्ह्यात येत असणे, या मतदासंघात नव्याने दोन नगरपंचायती स्थापन केलेल्या असणे, 1) अर्जुनी मोरगांव नगरपंचायत 2) सडक अर्जुनी नगरपंचायत, या नगरपंचायतींना प्रशासकीय भवन उपलब्ध नसणे नगरपंचायतीचा कारभार अत्यंत वाईट परिस्थितीत असणे, या नगरपंचायती करिता अनेकदा शासनाकडे निधीची मागणी केलेली असणे किमान या दोन्हीही नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारती करिता आवश्यक निधीची उपलब्धतेकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (७) | ४५८४ | १० | नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायतीना करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद येथे नगरविकास संकुलचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेला नसणे, त्यामूळे निधी अभावी सदर बांधकाम करता येत नसल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधीव्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद येथे नगरविकास संकूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ४५८५ | १० | नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायतीना करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे नगरविकास संकुलचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी सदर बांधकाम करता येत नसल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकास कामे मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे नगर विकास संकूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ४५८६ | १० | नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायतीना करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे नगर विकास संकुलचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी सदर बांधकाम करता येत नसल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधीव्दारे विकास कामे मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जिल्हयातील सावली नगरपंचायत येथे नगरविकास संकूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२१, रूपये:- २३,५५,७३,९५,०००/-**<br>**श्रीमती सुलभा खोडके** |
| (१०) | ४५४७ | १० | अमरावती शहरात अमृत योजनेअंतर्गत भुयारी गटारी योजना टप्पा क्रमांक १ राबविण्यात येत असून अद्यापही सदरचे काम पूर्ण झालेले नसणे, उक्त योजना अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने स्थानिक नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ४५४८ | १० | अमरावती शहरात महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावरील गटारे व नाले उघडी असल्याने येथे जीवघेणे अपघात होण्याची शक्यता असणे, याबाबत स्थानिक प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी व तक्रारी करुनही अद्याप कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, याकडे होणारे स्थानिक प्रशासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने शहरात पाहणी करुन येथील ड्रेनेज, चेंबर, नाले व डक यांची झाकणे सुस्थितीत करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१२) | ४५७३ | १०० | नाशिक महानगरपालिका मल:निस्सारण केंद्रांच्या आधुनिकीकरण व क्षमता वाढीबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविणेबाबत लोकप्रतिनिधींनी दि. ३ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे,दि. १३ जून २०२२ रोजीच्या राज्य नदी संवर्धन योजनेच्या प्रदत्त समिती बैठकीत या प्रकल्पाच्या डीपीआर ला राज्य शासनाने मान्यता दिलेली असणे, मात्र अद्यापपर्यंत या योजनेचा प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविलेला नसणे,नाशिक शहरातून गटारीच्या माध्यमातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते नदीपात्रात सोडण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने तपोवन येथे १३०, आगरटाकळी येथे ११०, चेहेडी येथे ४२ तसेच पंचक येथे ६०.५ एमएलडी असे एकूण ३४२.५० एमएलडी क्षमतेची मल:निस्सारण केंद्रे उभारली असणे, ही केंद्रे सन २०१५ पूर्वी वेळोवेळी कार्यान्वित झालेली असणे, सदर केंद्रे बांधकाम व कार्यान्वित करतेवेळी त्या-त्या वेळी लागू असलेल्या निकषानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची संमती घेण्यात आली असणे, तथापी दरम्यानच्या काळात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी निकष अधिक कडक केल्याने नवीन निकषानुसार मल:निस्सारण केंद्राचा सुधारित डी.पी.आर करणे आवश्यक झाले असणे, त्या अनुषंगाने नाशिक मनपाने अस्तित्वात असलेल्या चारही मल:निस्सारण केंद्रांचे सुधारित डी.पी.आर केलेले असून महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण विभागाला ऑक्टोबर २०२१ मध्ये सादर केलेले असणे,मात्र राज्यसरकारकडून अध्यापही हा प्रस्ताव केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला नसणे, नाशिक शहराचा वाढता विस्तार व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नाशिक शहरातून वाहणाऱ्या गोदावरी व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तिच्या उपनद्या यांचे स्वच्छतेच्या दृष्टीने सदर मल:निस्सारण केंद्राची अत्यंत आवश्यकता असणे, या योजनेचा प्रस्ताव राज्य शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत मंजूर करून केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविणेची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२२, रूपये:- २१,५४,२६,००,०००/-**<br>**श्री. सुनिल केदार** |
| (१३) | ४७०० | १० | नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायतीना करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकातासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद व सिंदेवाही आणि सावली येथे नगरविकास संकुलचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी सदर बांधकाम करता येत नसल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकास कामे मंजूर केले आहे, त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील सावनेर व खापा नगरपरिषद येथे नगरविकास संकूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ४७०२ | १० | नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायतीना करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील सावनेर व खापा नगरपरिष नगरविकास संकुलचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी सदर बांधकाम करता येत नसल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील सावनेर व खापा नगरपरिषद येथे नगर विकास संकूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ४७०५ | १० | नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायतीना करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकातासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्ातील कळमेश्वर व मोहपा नगरपरिष नगर विकास संकुलचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी सदर बांधकाम करता येत नसल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी सोयीसुविधा निर्माण करणे या योजनेतंर्गत नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्यातील कळमेश्वर व मोहपा नगरपरिषद येथे नगर विकास संकूल उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ४७०७ | १० | नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील सावनेर व खापा नगरपरिषद येथील विविध विकासकामांना १ एप्रिल २०२१ या वर्षापासून तर आतापर्यंत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूरी देणे, यासर्व कामांना तांत्रिक मान्यता मिळणे, आता कामाला प्रत्याक्षात सुरवात होणार तेच शासनाने माहे जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागांना कळविलेले असणे, त्यामूळे सावनेर तालुक्यातील सावनेर व खापा नगरपरिषद मधील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने अनेक कामावरील स्थगिती उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने दिलेली स्थगिती रदद करून नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील सावनेर व खापा नगरपरिषद मधील सर्व विकासकामे पुवर्वत सुरू राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ४७११ | १० | नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्यातील कळमेश्वर व मोहपा नगरपरिषद येथील विविध विकासकामांना १ एप्रिल २०२१ या वर्षापासून तर आतापर्यंत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूरी देणे, यासर्व कामांना तांत्रिक मान्यता मिळणे, आता कामाला प्रत्याक्षात सुरवात होणार तेच शासनाने माहे जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागांना कळविलेले असणे, त्यामूळे कळमेश्वर तालुक्यातील कळमेश्वर व मोहपा नगरपरिषद मधील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | समस्या निर्माण होणे, त्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने अनेक कामावरील स्थगिती उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने दिलेली स्थगिती रदद करून नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्यातील कळमेश्वर व मोहपा नगरपरिषद मधील सर्व विकासकामे पुवर्वत सुरू राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. माणिकराव कोकाटे** |
| (१८) | ४६०६ | १० | विशेष रस्ता अनुदान आणि वैशिष्ट्येपूर्ण अनुदान योजने अंतर्गत वैशिष्ट्ये पूर्ण कामांसाठी सिन्नर नगपालिका हद्दीतील रस्ते व गटार तसेच सिन्नर शहरातील मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या सरस्वती नदी सुशोभिकरण व रुंदीकरण या कामांसाठी सन २०२१-२०२२ मध्ये निधी उपलब्ध झालेला असणे, सदरची कामे ही शहरातील नागरिकांच्या दृष्टीकोनातून महत्वाची असणे परंतु सदरच्या कामांना शासनस्तरावरून स्थगिती दिलेली असल्याने ही कामे अद्यापही सुरु न होणे, त्यातच माहे सप्टेंबर २०२२ मध्ये सिन्नर शहरात अतिवृष्टी (ढग फुटी) झाल्याने शहरातील सरस्वती नदीकाठच्या झोपडपट्टी व दुकाने पुरात वाहून गेली त्यातच या नदीवरील पूल व रस्ते वाहून गेल्याने सद्यस्थितीत शहरातील दळणवळण विस्कळीत होऊन नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झालेली आहे त्यामुळे विशेष रस्ता अनुदान आणि वैशिष्ट्येपूर्ण अनुदान योजने अंतर्गत वैशिष्ट्ये पूर्ण कामांसाठी सिन्नर नगपालिकेस प्राप्त निधीवरील स्थागिती उठविण्यात यावी तसेच शहरातील सरस्वती नदीचे सुशोभिकरण व रुंदीकरणाच्या कामांसाठी नव्याने निधी उपलब्ध करून देण्याची असलेली आवश्यकता याबाबत शासनेने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (१९) | ४६७५ | १० | पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र जेजुरी हे अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असलेले श्री. खंडेरायाचे प्रसिध्द देवस्थान असून येथे संपूर्ण भारतातून व जगभरातून भाविक , भक्त वर्ग मोठया संख्येने येत असतात. जेजुरी नगरपरिषद ही क वर्गामध्ये येत असल्याने येथील नगरपालिकेचे उत्पन्न अल्प आहे. त्यामुळे नगरपालिकेला इतर उत्पन्नाचे स्तोत्र नसल्याने येथील मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरिता नगरपालिकेला वैशिष्टपुर्ण, नगरोत्थान व विशेष रस्ते अनुदान व इतर योजनेतंर्गत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू मुलभूत सोयीसुविधा अभावी येणा-या भाविकांना तसेच येथे रहात असलेल्या स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याने याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष , परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ४६७६ | १० | पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील सासवड हे ऐतिहासिक धरोवर प्राप्त असलेले छोटेखानी शहर आहे. हे पुणे जिल्हयाच्या केंद्रस्थानी आहे. या ठिकाणी ब-याचश्या जिल्हयातून रोजगारानिमित्त आलेले नागरिक वास्तव्य करीत असुन ते स्थानिक झालेले आहेत. त्यामुळे शहराचा विस्तार होत आहे. त्यामुळे सासवड नगरपालिका ही क वर्गात येत असल्यामुळे तसेच नगरपालिकेला इतर उत्पन्नाचे स्तोत्र नसल्याने येथील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरिता नगरपालिकेला जिल्हास्तरीय व शासनस्तरीय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | वैशिष्टपुर्ण, नगरोत्थान व विशेष रस्ते अनुदान व इतर योजनेतंर्गत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू मुलभूत सोयीसुविधा अभावी येणाऱ्या भाविकांना तसेच येथे रहात असलेल्या स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याने याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (२१) | ४६७८ | १० | पुणे जिल्हयातील भोर तालुक्यातील भोर नगरपरिषद क वर्ग नगरपरिषद असुन ती डोंगरी दुर्गम व अतिपावसाळी भागात कार्यान्वित आहे. क वर्ग नगरपरिषद असल्याने नगरपालिकचे उत्पन्न अल्प आहे. त्यामुळे नगरपालिकेला इतर उत्पन्नाचे स्तोत्र नसल्याने येथील मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरिता नगरपालिकेला वैशिष्टपुर्ण , नगरोत्थान व विशेष रस्ते अनुदान व इतर योजनेतंर्गत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू मुलभूत सोयीसुविधा अभावी येणा-या भाविकांना तसेच येथे रहात असलेल्या स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याने याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष , परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२२) | ४५४९ | १० | भंडारा जिल्हयातील सकोली नगरपरिषदला स्वतंत्र इमारत नसणे, त्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या नागरीकांना त्रास सहन करावा लागणे, जुनी इमारत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना बैठकीची व्यवस्था नसणे, त्यामुळे तेथील कर्मचारी वर्गांना दुसऱ्या इमारतीमध्ये तात्पुरती बैठकीची व्यवस्था नसणे, त्यामुळे तेथील कर्मचारी वर्गांना दुसऱ्या इमारतीमध्ये तात्पुरती स्वरुपात स्थलांतरामुळे नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असणे, साकोली नगरपरिषद अंतर्गत क्षेत्रातील रहिवासी संख्या जवळपास २८,००० असून शहरामध्ये स्वतंत्र पिण्याच्या पण्याची व्यवस्था नसल्यामळे तेथील नागरीकांना शुध्द पिण्याचे पाणी न मिळणे, नगरपरिषद क्षेत्रातील रस्ते अत्यंत खराब असणे व गटाऱ्यांचे कव्हरसहीत बांधकाम नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ४५५० | १० | भंडारा जिल्हयातील लाखनी नगर पंचायती स्वतंत्र्य इमारत नसणे, त्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या नागरीकांना त्रास सहन करावा लागणे, जुनी इमारत असल्यामुळ कर्मचाऱ्यांना बैठकीची व्यवस्था नसणे, त्यामुळे नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असणे, लाखनी नगर पंचायत अंतर्गत क्षेत्रातील रहिवासी संख्या जवळपास १२,००० असून शहरामध्ये स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्यामुळ तेथील नागरीकांना शुध्द पिण्याचे पाणी न मिळणे, लाखनी नगर पंचायत क्षेत्रातील गटाऱ्यांचे कव्हरसहित बांधकाम नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ४५५१ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर नगर पंचायतची स्वतंत्र इमारत नसणे, जुनी इमारत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना बैठकीची व्यवस्था नसणे, त्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असणे, लाखांदूर नगरपंचायत अंतर्गत क्षेत्रातील रहिवासी संख्या १५,००० असून शहरामध्ये स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व्यवस्था नसल्यामुळे तेथील नागरीकांना शुध्द पिण्याचे पाणी न मिळणे, लाखांदूर नगर पंचायत क्षेत्रातील गटाऱ्यांचे कव्हरसहित बांधकाम नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रोहित पवार** |
| (२५) | ४५२१ | १० | शासनाच्या नगरविकास विभागाच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण पूर्ण योजनेअंतर्गत नगर परिषदांना निधी वितरित करण्याबाबत जामखेड नगरपरिषद जिल्हा अहमदनगर करिता दिनांक 19 एप्रिल 2022 रोजी रक्कम रुपये 3 कोटी 71लक्ष रुपयांच्या विकास कामांना मंजुरी देण्यात आलेली असून नगर विकास विभागाने स्थगिती दिली आहे. दिलेली स्थगिती उठविणेसाठी मा. मंत्री नगरविकास यांना निवेदना द्वारे विनंती सादर केली आहे. स्थगिती उठविणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (२६) | ४६०५ | १० | वैशिष्ट्येपूर्ण कामांसाठी नगरपरिषदांना विशेष अनुदान देणेकरीता रुपये २०६४२६००००० इतक्या निधीची तरतूद केलेली आहे, माझ्या मतदार संघातील निफाड या शहरास नगरपंचायतीचा दर्जा दिलेला असणे तसेच ओझर मिग या शहरास नुकताच नगरपरिषदेचा दर्जा मिळालेला असल्याने या दोन्ही शहरांच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देनेची नितांत आवश्यकता असणे परंतु या शहरांच्या विकासासाठी शासन स्तरावरून कुठलाही निधी अद्याप उपलब्ध झालेला नसणे, त्यातच ओझर मिग शहरामध्ये डम्पिंग ग्राउंड चा मोठा यक्ष प्रश्न निर्माण झालेला असणे सद्या शहरातील कचरा उघड्यावर जळत असल्याने नागरिकांना त्याचा मोठा त्रास होऊन आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे येथील कचऱ्याची विल्हेवाट लावणे व शहरातील रस्ते, सांडपाणी व सौंदर्यीकरण करणे यासाठी निफाड नगरपंचायत व ओझर मिग नगरपरिषद यांना मोठ्या प्रमाणात वैशिष्ट्येपूर्ण कामांसाठी निधी उपलब्ध करून देनेची नितांत गरज असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२७) | ४५६२ | १०० | येवला (जि.नाशिक) नगरपरिषदेसाठी वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान - ठोक तरतूद लेखाशिर्ष (४२१७०६०३) (२०२०-२०२१) अंतर्गत दि. २४/०२/२०२० च्या पत्रान्वये ५ कोटी निधीची तरतूद करण्यात आलेली असणे, या मंजूर अनुदानामधून जिल्हाधिकारी नाशिक यांनी दि. ९ मार्च २०२१ च्या आदेशान्वये मुलभूत व प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्यासाठी रुपये ४,९७,५९,७०२/- रक्कमेच्या २१ विकास कामांना प्रशासकीय मंजुरी दिली असणे, ही कामे पूर्ण झाली असून मात्र सदर कामांना अद्याप निधी प्राप्त झालेला नसणे, या कामासाठी निधी उपलब्ध न झाल्यामुळे कत्राटदारांनी उपोषणाचा इशारा दिलेला असणे,जिल्हाधिकारी नाशिक यांनी येवला नगरपरिषदेसाठी पत्र क्र. कक्ष २/नपा २/५८१/२०२२ दि.१५/३/२०२२ अन्वये नगरविकास विभागाकडे मागणी केलेला रुपये ४,९७,५९,७०२/- निधी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ४६२४ | १०० | येवला, जि. नाशिक नगरपरिषदेमधील मुलभूत सुविधेच्या विविध ८ विकासकामांना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|

नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेतून निधी मिळण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२८ सप्टेंबर २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केलेली असणे, सदर मुलभूत सुविधांची येवला शहरामध्ये नितांत आवश्यकता असणे, नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेतून सदर विकासकामे मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**श्री. विजय वडेट्टीवार**

(२९) ४५६६ १० चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत येथील पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेता नगरपंचायत सिंदेवाही-लोनवाही यांनी ६० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करणे, या प्रस्तावास महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागागकडून तांत्रिक मान्यता घेऊन अंतिम मान्यतेसाठी परिपुर्ण प्रस्ताव संचालक, नगरप्रशासन विभाग,मुंबई यांच्याकडे गेल्या दोन महिण्यापुर्वी सादर करणे, सदर प्रस्तावास तपासणी करून अंतिम मान्यता मिळण्यासाठी प्रधान सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुबई यांच्याकडे सादर करणे आवश्यक असतांना अघापही सदर प्रस्ताव संचालक,नगरप्रशासन विभाग,मुंबई यांच्याकडे प्रलंबित असणे, सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत येथील पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेता प्राप्त झालेल्या पाणी पुरवठा योजनेस तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

(३०) ४५६८ १० नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद येथील विविध विकासकामांना १ एप्रिल २०२१ या वर्षापासून तर आतापर्यत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूरी देणे, यासर्व कामांना तांत्रिक मान्यता मिळणे, आता कामाला प्रत्याक्षात सुरवात होणार तेच शासनाने माहे जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविलेले असणे, त्यामूळे ब्रम्हपूरी नगरपरिषद मधील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने अनेक कामावरील स्थगिती उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने दिलेली स्थगिती रदद करूनन ब्रम्हपूरी नगरपरिषद मधील सर्व विकासकामे पुवर्वत सुरू राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

(३१) ४५७० १० नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत येथील विविध विकासकामांना १ एप्रिल २०२१ या वर्षापासून तर आतापर्यत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूरी देणे, यासर्व कामांना तांत्रिक मान्यता मिळणे, आता कामाला प्रत्याक्षात सुरवात होणार तेच शासनाने माहे जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविलेले असणे, त्यामूळे सावली नगरपंचायत मधील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने अनेक कामावरील स्थगिती उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने दिलेली स्थगिती रदद करून सावली नगरपंचायत मधील सर्व विकासकामे पुवर्वत सुरू राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ४५७१ | १० | नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत येथील विविध विकासकामांना १ एप्रिल २०२१ या वर्षापासून तर आतापर्यत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूरी देणे, यासर्व कामांना तांत्रिक मान्यता मिळणे, आता कामाला प्रत्याक्षात सुरवात होणार तेच शासनाने माहे जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविलेले असणे, त्यामूळे सिंदेवाही नगरपंचायत मधील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने अनेक कामावरील स्थगिती उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने दिलेली स्थगिती रदद करून सिंदेवाही नगरपंचायत मधील सर्व विकासकामे पुवर्वत सुरू राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३३) | ४५७५ | १० | नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक शहरासाठी विविध विकास कामे मंजूर करून त्यासाठी करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद शहरातील नाल्याचे बांधकाम काणे, नाल्या अंडरग्रांऊड करणे, शहरातील सर्व रस्ते सिमेंट क्राकींटचे बांधकाम करणे, नाटय गृह/सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करणे, चौकाचे सौदर्यीकरण करणे, यासह विविध विकासकामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी कामे करता येत नसल्यामूळे दिवसेंदिवस शहरात अनेक समस्या निर्माण होत असल्याने नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाकडून नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदेमधील विविध विकासकामांना किमान १०० कोटी रुपयांचे निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३४) | ४५७६ | १० | नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक शहरासाठी विविध विकास कामे मंजूर करून त्यासाठी करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत शहरातील नाल्याचे बांधकाम काणे, नाल्या अंडरग्रांऊड करणे, शहरातील सर्व रस्ते सिमेंट क्राकींटचे बांधकाम करणे, नाटय गृह/सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करणे, चौकाचे सौदर्यीकरण करणे, यासह विविध विकासकामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी कामे करता येत नसल्यामूळे दिवसेंदिवस शहरात अनेक समस्या निर्माण होत असल्याने नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाकडून नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत मधील विविध विकासकामांना प्रत्येकी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ४५७८ | १० | नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक शहरासाठी विविध विकास कामे मंजूर करून त्यासाठी करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत शहरातील नाल्याचे बांधकाम काणे, नाल्या अंडरग्रांऊड करणे, शहरातील सर्व रस्ते सिमेंट क्राकींटचे बांधकाम करणे, नाटय गृह/सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करणे, चौकाचे सौदर्यीकरण करणे, यासह विविध विकासकामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही निधी उपलब्ध झालेली नसणे, त्यामूळे निधी अभावी कामे करता येत नसल्यामूळे दिवसेंदिवस शहरात अनेक समस्या निर्माण होत असल्याने नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाकडून नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत मधील विविध विकासकामांना प्रत्येकी ७० कोटी रुपयांचे निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३६) | ४५९३ | १० | नगरपरिषद अंजनगाव सुर्जीकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने शहरातील बहुतांश भागात मूलभूत सुविधेचे कामांचा अभाव आहे, तसेच शासनामार्फत नगरपरिषदाना विविध योजने अंतर्गत मिळणारा निधी अत्यंत कमी असून शहरातील बहुतांश भाग मूलभूत सुविधेपासून वंचीत आहे. वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी नगरपरिषदाना विशेष अनुदान अंतर्गत न प अंजनगाव सुर्जी येथील विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३७) | ४५९५ | १० | नगर परिषद दर्यापूर कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने शहरातील बहुतांश भागात मूलभूत सुविधेचे कामांचा अभाव आहे, तसेच शासनामार्फत नगर परिषदाना विविध योजने अंतर्गत मिळणारा निधी अत्यंत कमी असून शरातील बहुतांश भाग मूलभूत सुविधेपासून वंचीत आहे. वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी नगरपरिषदाना विशेष अनुदान अंतर्गत न प दर्यापूर अंतर्गत विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ४५९६ | १० | नगरपरिषद दर्यापूर ची माहे जून २०२१ मध्ये हद्दवाढ झालेली असून यात लहगाव , गायवाडी , शिवर , पेठ इतबारपूर, पेठ जहानपुर ग्रामपंचायत हद्दीतील शहारालगत असलेल्या भागांचा मोठ्या प्रमाणात समावेश झाला असून हद्दवाढ झालेल्या भागात मूलभूत सोयी सुविधेचा अभाव आहे. हद्दवाढ झालेल्या भागांचा सुधारीत विकास आराखडा निर्माण करून या भागाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | ४६७३ | १० | " नगर परिषद दर्यापूर अंतर्गत विकसित झालेल्या साईनगर , पंजाबराव कॉलनी , ड्रिमलँड सिटी , समता नगर , शिवभोले नगर , अवधूत नगर , शिवर रोड , हिंगणी रोड , सहकार नगर या भागात गटारे नसल्याने मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून जागोजागी सांडपाणी साचले आहेत , या सांडपाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने भुयारी गटार योजना राबवणे आवश्यक आहे. या योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही." |
| (४०) | ४६७४ | १० | " नगरपरिषद दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी अंतर्गत थोर महापुरुषांचे पुतळे उघड्यावर असून त्याचे जतन करणे आवश्यक असणे, परंतु या करता दोन्ही नगरपरिषदांकडे स्वंतत्र निधी नसल्याने थोर महापुरुषांचे पुतळे उघल्यावर पडले आहेत. त्याचे सौंदर्यीकरण व जतन करण्यासाठी तसेच दोन्ही शहरा अंतर्गत वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांसाठी प्रत्येक चौकात "नाना नाणी पार्कचे" बांधकाम होण्याच्या दृष्टीने नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान अंतर्गत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ६२१७, नगरविकासासाठी कर्जे**<br>**बाब क्रमांक: १२३, रूपये:- १३,०४,००,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (४१) | ४५८० | १०० | गेल्या काही दिवसांमध्ये मुंबईच्या वातावरणात पसरलेल्या धुलीकणांनी मुंबईकरांच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नाकीनऊ आणलेले असणे, दि.७ ते ११ डिसेंबर दरम्यान तर मुंबईची हवा दिल्लीच्या तुलनेत कित्येक पटींनी प्रदूषित नोंदविण्यात आली असणे, मुंबईतल्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक ३१५ तर दिल्लीचा २६२ एवढा नोंदविण्यात आला असणे, परिणामी आता मुंबईने प्रदूषणाने दिल्लीलाही मागे टाकलेले असणे, मुंबई मधील उत्तरोत्तर वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांना श्वास गुदमरू लागला असणे,गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या हवेची गुणवत्ता लक्षणीय प्रमाणात घसरली असणे, मुंबई आणि परिसरावर संपूर्ण धुक्याचे साम्राज्य पसरलेले असणे, त्यामुळे अनेकांना श्वसनविकारांना सामोरे जावे लागत असणे,मानसोपचार तज्ज्ञांच्या मते प्रदूषित हवेचा परिणाम केवळ श्वसनावरच नव्हे तर मेंदूच्या पेशींवरही होत असणे, त्यामुळे श्वसनविकार, स्मरणशक्ती आणि विश्लेषणात्मक विचार प्रक्रिया बाधित होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण सुद्धा मुंबईत लक्षणीयरीत्या आढळत असणे, मुंबई शहराशेजारी असलेल्या रिफायनरींमुळे मुंबई मधील हवा प्रदूषित होत असल्याचे तज्ञांचे मत असणे, मात्र याबाबत तपासणी करून मुंबई मधील प्रदूषणावर उपाययोजना करण्यासाठी शासनाची प्रतिक्रिया. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : २१ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर